RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ६२(५)] गुरुवार, सप्टेंबर ३, २०२६/भाद्रपद १२, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १४८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई. ४०००३२, दिनांक ३ सप्टेंबर, २०२६.

**नोटीस**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४.**

क्रमांक एमआरडी-३३१२/प्र.क्र.३२(भाग-२)/नवि-७.—सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४) च्या कलम ३२ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे मोनोरेलच्या स्वरूपातील ट्रामवेचे बांधकाम व परिरक्षा करण्याच्या प्रयोजनार्थ विवक्षित जमीन संपादित करण्यासाठी एक अधिसूचना (जिचा मसुदा यासोबत जोडला आहे) प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे;

२. याद्वारे उक्त जमिनीचे मालक किंवा इतर हितसंबंधी व्यक्तींना अशी कारणे दाखवण्यास पाचारण करण्यात येत आहे की, सदर जमीन का संपादित करू नये, याबाबतची कारणे त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रा**त प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना लेखी स्वरूपात सादर करावीत;

३. या सूचनेनुसार विहित कालावधीत प्राप्त झालेल्या अशा कोणत्याही कारणांचा शासनाकडून विचार केला जाईल.

**प्रारूप अधिसूचना**

क्रमांक एमआरडी-३३१२/प्र.क्र.३२(भाग-२)/नवि-७.—ज्याअर्थी, ट्रॅममार्ग अधिनियम, १८८६ (१८८६ चा ११) याच्या कलम ४, पोट-कलम (१), खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग, क्रमांक एमएमआर-३३०८/प्र.क्र.७२/नवि-७, दिनांक १ नोव्हेंबर २००८ द्वारे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) याला जेकब सर्कल ते वडाळा आणि वडाळा ते चेंबूर (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त मोनोरेल प्रकल्प" असा करण्यात आला आहे) या मार्गामध्ये मोनोरेलच्या स्वरूपात ट्राममार्ग बांधण्यासाठी व त्याचे परिरक्षण करण्यासाठी प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या निवेदनावरून राज्य शासनाला असे दिसून आले आहे की, उक्त मोनोरेल प्रकल्पाचे बांधकाम करण्यासाठी, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली विवक्षित जमीन संपादित करणे आवश्यक आहे; (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४) याच्या कलम ३२, पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये आवश्यक असल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, शासकीय राजपत्र, असाधारण भाग एक-अ, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२६ रोजी नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि उक्त नोटीस जमिनीचा मालक आणि इतर हितसंबंधित व्यक्ती यांच्यावर रितसर बजावण्यात देखील आली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकाने आणि इतर कोणत्याही हितसंबंधित व्यक्तींनी उक्त नोटिशीस अनुसरुन, दाखविलेल्या कारणांचा विचार केल्यानंतर, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचे संपादन करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

**अनुसूची**

| विभाग/ गाव/ नगराचे नाव (१) | मिळकत पत्रिकेनुसार जमीन मालकाचे नाव (२) | नगर भूमापन क्रमांक (३) | एकूण क्षेत्र (चौ.मीटर मध्ये) (४) | संपादित करावयाचे असलेले क्षेत्र (चौ.मी. मध्ये) (५) |
|---|---|---|---|---|
| माटुंगा,मुंबई शहर जिल्हा | मे. दोस्ती रिअॅल्टी लिमिटेड | ३४६ | १०३०.९५ | २८०.१९ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय चौधरी**
शासनाचे सहसचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai, 400032, dated 3rd September, 2026.

### Notice

Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974.

No. MRD-3312/C.R.32(Part-2)/UD-7.—IT IS BROUGHT TO THE NOTICE OF ALL THE CONCERNED THAT, the Government of Maharashtra, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 32 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah. IV of 1975), proposes to issue a notification, the draft of which is appended herewith for acquisition of certain land for the purpose of construction and maintenance of Tramway in the form of Monorail by the Mumbai Metropolitan Region Development Authority;

2. The owner or any other person interested in the said land is hereby called upon to show cause, in writing, to the Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra(E), Mumbai 400 051 within a period of **15 days,** from the date of publication of this Notice in the *Maharashtra Government Gazette*, as to why the said land should not be acquired;

3. Any such cause shown pursuant to this Notice, which may be received during the said period, will be considered by the Government.

### DRAFT NOTIFICATION

No. MRD-3312/C.R.32(Part-2)/UD-7.- Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Urban Development Department, No. MMR-3308/C.R. 72/U.D.-7, dated 1st November 2008, issued in exercise of the powers conferred by clause (a) of sub-section (*1*) of section 1 of the Tramways Act, 1886 (11 of 1886), authorized construction and maintenance of Tramways in the form of Monorail from Jacob Circle to Wadala and Wadala to Chembur (hereinafter referred to as "the said Monorail Project") by the Mumbai Metropolitan Region Development Authority established under section 3 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah. IV of 1975), (hereinafter referred to as "the said Authority");

And Whereas, on representation from the said Authority, it appears to the State Government that, in order to carryout the construction of the said Monorail Project, it is necessary to acquire certain land, more particularly specified in the Schedule appended hereto; (hereinafter referred to as the said land);

And Whereas, the Notice as required under the proviso to sub-section (*1*) of section 32 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah. IV of 1975), has been published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part I-A, on the 3rd September, 2026; and the said Notice has also been duly served on the owner and other persons interested in the said land;

And Whereas, after considering the cause shown by the owner and other persons interested in the said land, pursuant to the said Notice, the Government of Maharashtra considers it expedient to acquire the land specified in the Schedule appended hereto.

*SCHEDULE*

| Name of the Division/ Village/ Town | Name of the owner as per property card | C.T.S. No. | Total Area (in Sq.mtrs.) | Area proposed to be acquired in (Sq.Mtrs.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| Matunga Mumbai City District | Mr. Dosti Realty Limited | 346 | 1030.95 | 280.19 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY CHAUDHARI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.